# ऋणनिर्देश

एक कलाकार म्हणून मी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. गेल्या बत्तीस वर्षांत अनेक मराठी, हिंदी चित्रपट व दूरदर्शन मालिकेत छोट्या-मोठ्या अनेक भूमिका केल्या. अनेक प्रथितयश कलाकार दिग्दर्शक आणि तंत्रज्ञ यांच्या अगदी जवळून वावरलो. जुन्या जाणत्या सुलोचना दीदी, जयश्री गडकर, सूर्यकांत, अभिभट्टाचार्य, डॉ. लागू आणि गिरीश कर्नाड यांच्यापासून ते विनोद मेहरा, स्मिता पाटील, नाना पाटेकर, सुधा चंद्रन, प्रिया तेंडूलकर, निळू फुले, लक्ष्मीकांत बेर्डे, अशोक सराफ, मोहन जोशी, पल्लवी जोशी, वर्षा उसगावकर, किट्टू गिडवानी... ही यादी खूपच मोठी आहे... अशा बुजुर्गांबरोबर छोट्या-मोठ्या भूमिका करायला मिळाल्या. आपलेपणानं वावरायला मिळालं... किती मोठ्ठं भाग्य हे! कथा-पटकथा-संवाद इतकेच नव्हे तर व्यवस्थापन आणि दिग्दर्शन या सगळ्यांचा जवळून अनुभव घेतला. शास्त्रोक्तदृष्ट्या म्हणायचं तर गेली बत्तीस वर्षे चित्रपटसृष्टीत सहभागी निरिक्षण केलं. अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचा 'अ' वर्ग सभासदही झालो. या प्रवासात अनेकांचं सहकार्य लाभलं. भरभरुन प्रेम मिळालं. त्या सर्वांचा मी शतशः ऋणी आहे.

हा लघुशोध प्रबंध लिहिण्यासाठी मला सदासर्वकाळ सहकार्य करणारे डॉ. रत्नाकर पंडित यांचे आधार मानणे मी माझे परम कर्तव्य समजतो. त्यांनी घेतलेले परिश्रम वाखाणण्यासारखे आहेत.

औरंगाबादचे प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर, ज्ञान घ्यायला आणि ज्ञान द्यायला सदैव तत्पर असणारे प्रचंड अभ्यासू व्यक्तिमत्त्व. शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारीता विभागातच नव्हे तर कोठेही असणारी त्यांची जास्तीतजास्त व्याख्याने मी एकाग्रतेने ऐकली. अनेक विषयांवर तसेच या प्रबंधासाठीही त्यांनी वेळोवेळी मला मार्गदर्शन केलं आहे. त्यांच्या ऋणात राहण्याचा आनंद काही वेगळाच आहे.

वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. निशा पवार,

डॉ. प्रताप पाटील तसेच प्रा. दयानंद कांबळे (जिल्हा प्रसिद्धी अधिकारी) यांनी वेळोवेळी केलेले सहकार्य आणि मार्गदर्शन विसरता येणे शक्य नाही. त्यांचाही मी ऋणी आहे.

डॉ. बी. एम्. हिर्डेकर (परीक्षा नियंत्रक), प्रा. डॉ.चौसाळकर, प्रा. डॉ. वासंती रासम आणि प्रा. डॉ. सर्जेराव साळुंखे यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे ऋण मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

या लघु शोधप्रबंधासाठी मुलाखतीसाठी मुद्दाम वेळ काढून मार्गदर्शन करणाऱ्या- श्री चंद्रकांत जोशी, भालचंद्र कुलकर्णी, शशी गजवानी, सुभाष भुर्के, डॉ. वि.ल. धारुरकर, संजय मोहीते, मनोहर कुईंगडे, ज्यु. धुमाळ, पत्रकार बाबा मोहमद आत्तार आणि कॅमेरामन प्रकाश शिंदे या जाणकारांचेही आभार.

प्रा. डॉ. सुलोचना श्रीहरी देशपांडे, लग्नानंतर नोकरी आणि घर सांभाळून, अत्यंत कष्टाने बी. एड्., एम्.एड्., एम्. फिल., पीएच्.डी. (हिंदी), करणारी माझी धर्मपत्नी - त्यांच्या शिक्षण आणि विविध विषयावरील ग्रंथलेखन करण्याच्या अनुभवाचा मला प्रेरणादायक असा उपयोग झाला आहे. ऋण आणि आभार मानणे योग्य नव्हे.

अखिल भारतीय चित्रपट महामंडळ, कोल्हापूरचे व्यवस्थापक रविंद्र बोरगावकर यांनी चित्रपटाविषयी खूप माहीती दिली. डॉ. कविता गगराणी यांनी केलेलं सहकार्य आणि माझी विद्यार्थीनी सुमेधा साळुंखे यांनी केलेल्या मदतीबद्दल त्यांचे आभार.

वृत्तपत्रविद्या विभागाचे पूर्वीचे कर्मचारी सदानंद मोरे, रामनाथ पोवार तसेच सुधाकर आणि कांबळे यांचाही मी ऋणी आहे.

अतिशय सुबकरित्या डी.टी.पी. करुन अगदी वेळेत या प्रबंधाचे काम करुन देणाऱ्या सौ. पद्मजा गोलिवडेकर मॅडम तसेच झेरॉक्सपासून अनेक गोष्टींसाठी पळापळ करुन सहकार्य करणारा माझा मुलगा चि. शैलेश आणि सौ. साक्षी यांचेही सहकार्य फार मोलाचे आहे. बायडिंग वेळेत करुन देणारे श्री. महालक्ष्मी प्रिटींग वर्क्सचेही आभार.

अभ्यासक

दि. : मे. २००९

कोल्हापूर.

डॉ. श्रीहरी देशपांडे